➢ **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), जिल्हा परिषद पालघर.**

राज्यातील बारावा हागणदारी मुक्त पालघर जिल्हा ०२ ऑक्टोबर २०१७ रोजी घोषित करण्यात आला. मा. प्रधानमंत्री यांनी अग्रक्रमाने हाती घेतलेल्या हागणदारी मुक्तीच्या चळवळीमध्ये जिल्ह्यातील सर्वच म्हणजे ४७२ ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला होता. घर तेथे शौचालय या मुख्य उपक्रमाबरोबरच घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन तसेच शालेय अंगणवाडी सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि स्वच्छ पिण्याचे पाणी हे या अभियानातील महत्वपूर्ण घटक आहेत. जून २०१६ मध्ये राज्य शासनाने मार्च २०१८ पर्यंत हागणदारी मुक्त करण्याचे आव्हान दिले होते. परंतू पालघर जिल्हा परिषदेने सप्टेबर २०१७ अखेरपर्यंत १ लाख ७ हजार शौचालये पूर्ण करत अवघ्या १५ महिन्यातच हे आव्हान समर्थपणे पूर्ण केले आहे. जिल्ह्यातील सर्वच ग्रामपंचयातींची तपासणी करण्यासाठी त्यांचा दर्जा व पात्रता ठरविण्यासाठी राज्य शासनाने स्वच्छता क्षेत्रात काम करणाऱ्या १२ त्रयस्थ स्वयंसेवी संस्थांची/मुख्य संसाधन कैंद्र(KRC) यांची नियुक्ती केली होती.

महाराष्ट्रातील आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळख असलेला पालघर जिल्हा पहिला हागणदारी मुक्त करून महाराष्ट्रासमोर आदर्श निर्माण केला आहे. पालघर जिल्हा सागरी, डोंगरी, व नागरी भागाची पाश्वभुमी लाभलेला जिल्हा आहे. जिल्हयातील ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे व प्रत्येक कुटूंबानी शौचालय बांधून त्याचा नियमित वापर करणे याची जनजागृती करण्यासाठी पाणी व स्वच्छता विभागाने सर्वांगिण विकासासाठी तसेच स्वच्छ व सुंदर पालघर करण्याकरिता पालघर जिल्हा परिषदेने स्वच्छ पाडा, स्वच्छ घर, निर्मल आपले पालघर हे आपले घोषवाक्य बनवून विविध उपाययोजना केल्या जिल्ह्यातील प्रसार माध्यमांनी या चळवळीत सकारात्मक भूमिका घेत प्रचार व प्रसिध्दीची धुरा प्रभावीपणे राबविली. तसेच जिल्हा व तालुकास्तरीय तज्ञ चमुचा सुयोग्य वापर करुन या चळवळीचा वेग राखण्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद बोरीकर (भाप्रसे) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी तसेच जनता या सर्वांचे प्रभावी प्रयत्न व सहभाग या सर्व बाबी यासाठी उपयुक्त ठरल्या आहेत. पालघर जिल्ह्याने हागणदारी मुक्ती ही लोकचळवळ होण्यासाठी समाजातील सर्व घटकांची साथ घेण्यात आली असून शासकीय अधिकारी, कर्मचारी जनजागृती व अंमलबजावणीसाठी घरोघरी भेटी देऊन प्रबोधन करणार आले. यासाठी जिल्हा परिषद पालघरने कुटूंबस्तर संवाद, भेटीगाठी स्वच्छतेसाठी, चित्र रथ, समुद्र किनारा स्वच्छता मोहिम, शालेय विद्यार्थांचे स्वच्छता मतदान, माझे शौचालय या विषयावर स्वच्छता सुरभी पोस्ट कार्ड, जिल्हा प्रशासनासोबत सामाजिक व सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था उद्योगांतील सीएसआर फंड, बचत गट, माध्यम व लोकसहभागासाठी Workshop On Improving Sanitation and Hygiene (WISH-1),(WISH-

2) सारखे उपक्रम, कठीण तालुक्यामध्ये निवासी अभियानासारखे नेहमीच पथदर्शी उपक्रम राबवून राज्याला मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली आहे. तसेच गांधीनगर येथे मा. पतंप्रधान यांच्या हस्ते स्वच्छता विषयी उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रतील एकमेव पालघर जिल्ह्यातील श्रीम.सुशिला कुरकुटे महिलेचा "स्त्री शक्ती" सन्मान करण्यात आला. स्वच्छ भारत मिशनच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख, गटविकास अधिकारी, स्वच्छ भारत मिशनची टीम, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, प्रसार माध्यमे, कलापथक यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याने हे यश प्राप्त झाले आहे. या पुढेही जिल्ह्यात स्वच्छतेमध्ये सातत्य राखण्याचे काम जबाबदारीने पार पाडेल. या कार्यात पदाधिकाऱ्यांचा सातत्यपूर्ण सहभाग राहील. जिल्हा परिषद पालघर यांनी हाती घेतलेली ही चळवळ हागणदारी मुक्त (प्लस) होईपर्यंत थांबविली जाणार नाही. यापुढेही प्राधान्याने घनकचरा व सांडपाणी या घटकांवर काम केले जाईल. कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण आणि वहन व व्यवस्थापन याद्वारे पालघर जिल्हा हागणदारी मुक्त (प्लस) करण्यात येईल. ग्रामपंचायतीमध्ये निर्माण झालेल्या स्वच्छता शाश्वत वापर व्हावा यासाठी गावात स्वच्छाग्रहीची निवड करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने नव्याने सुरवात केलेल्या 'गोबरधन' योजने अंतर्गत सार्वजनिक गोबरगॅस प्रकल्प उभारणीसाठी जिल्हात ५० ग्रामपंचायती अंतर्गत प्रकल्प तयार करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. याउपक्रमाअंतर्गत गावाने जनावरांचे गोठे, सार्वजनिक शौचालये, वैयक्तिक शोचालये, ओला कचरा इत्यादीचे विघटन करणे व त्यापासून उपलव्ध बायोगॅस पासून पथ दिवे चालविणे तसेच इंधन उपलब्ध करणे प्रस्तावित आहे.

- **संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानः-**

ग्रामस्वच्छता कार्यक्रमाचा मुळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्याचा आहे. ग्रामीण जनतेस हा कार्यक्रम आपला वाटावा व त्याचे महत्त्व पटून त्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळवा या दृष्टीकोनातून, सन 2000-01 पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत अहे. तसेच सन 2002-03 पासून स्वच्छतेशी व ग्रामविकासाशी निगडीत एखाद्या विशिष्ट क्षेत्रात भरीव काम करणा-या ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षीसे देण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला.

सन 2017-18 साली पालघर जिल्ह्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत तालुकास्तरावरील ग्रामपंचायतींची तालुकास्तरीय समिती मार्फत 4 जून 2016 च्या शासन निर्णयान्वये तपासणी करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आले. तालुकास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक

प्राप्त ग्रामपंचायती जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या. पात्र ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय तपासणी समितीमार्फत तपासणी करुन निकाल जाहीर करण्यात आला. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान 2017-18 मधील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर ग्रा.पं. वाणगाव, ग्रा.पं. मांडे व ग्रा.पं. हमरापुर या ग्रामपंचायतींनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. जिल्हा स्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रा.पं. विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या. त्यांची तपासणी कोंकण विभागीय समितीमार्फत करण्यात आली आहे.

दि. 25 एप्रिल 2018 च्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक सुचना शासनाने निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये जिल्ह्यात 1 मे 2018 पासून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सुरुवात झाली आहे. सुधारित मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने "उत्कृष्ट प्रभाग" या स्पर्धेचे आयोजन करावयाचे आहे. या स्पर्धेमध्ये निवडलेल्या "उत्कृष्ट प्रभागा" साठी रुपये 10,000/- इतके बक्षिस देण्यात येणार आहे. यानंतर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद गटातील सामाविष्ट ग्रामपंचायतींमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा आयोजित करावयाची आहे. या स्पर्धेमध्ये गटातून सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या ग्रामपंचायतीची निवड करावयाची आहे. गटात प्रथम येणा-या ग्रामपंचायतीला 50,000/- इतके बक्षिस देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गटातील प्रथम क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीची जिल्हास्तरीय तपासणी समिती कडून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची निवड करुन त्याचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावयाचा आहे. जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतीस अनुक्रमे 5,00,000/-, 3,00,000/- व 2,00,000/- इतके बश्रिस देण्यात येणार आहे.

- **पाणी गुणवत्ता:-**

सन २०१७ - १८ या वर्षात पावसाळ्यापूर्वी माहे १ मार्च ते ३१ मे २०१७ या कालावधीत तसेच पावसाळ्यानंतर १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. पावसाळ्यापूर्वीचे व पावसाळ्यानंतरचे सार्वजनिक स्त्रोतांचे पाणी नमुने MRSAC, Nagpur या कंपनीने तयार केलेल्या Geofencing या Mobile Application च्या सहाय्याने गोळा केले जातात. तसेच १ एप्रिल ते ३० एप्रिल २०१७ या कालावधीत पावसाळ्यापूर्वीची स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. या कालावधीत एकूण ८४४० स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १३ ग्रामपंचायतीना लाल कार्ड, २१४ ग्रामपंचायतीना पिवळे कार्ड व २४६ ग्रामपंचायतीना हिरवे कार्ड प्राप्त झाले. तसेच तसेच १

ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर २०१७ या कालावधीत पावसाळ्यानंतरची स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. या कालावधीत एकूण ९०१२ स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी १० ग्रामपंचायतीना लाल कार्ड, २१६ ग्रामपंचायतीना पिवळे कार्ड व २४९ ग्रामपंचायतीना हिरवे कार्ड प्राप्त झाले.

गाव जल सुरक्षितता व शास्वतता आराखडा तयार करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील हातेरी (तालुका - जव्हार) या गावाची निवड करण्यात आली होती. या गावात पाण्याची भीषण टंचाई होती. दि. ०९ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०१७ या तीन दिवसाच्या कालावधीत ग्रामस्तरीय पिण्याच्या पाण्याचा शाश्वतता व सुरक्षितता आराखडा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या प्रक्रियेमध्ये आराखडा निर्मितीसाठी प्रायमूव्ह, पुणे या संस्थेतील अधिकाऱ्यांसमवेत जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील सर्व अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ सहभागी होते. तदनंतर प्रायमूव्ह, पुणे या संस्थेने आराखड्यात सुचविलेल्या योजनांची जिल्हा तसेच तालुका स्तरावरून यशस्वीपणे पूर्तता करून हातेरी गाव टँकरमुक्त करण्यात आले. या गावात केलेल्या कामाची पाहणी करण्यासाठी केंद्रीय सहसचिव मा. व्ही. राधा, पाणी एवं स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली आल्या होत्या. त्यांनी गावात केलेल्या कामाची पाहणी करून गाव टँकरमुक्त केल्याबद्दल कौतुक केले.

सन २०१८ - १९ या वर्षात पावसाळ्यापूर्वी माहे १ मार्च ते ३१ मे २०१८ या कालावधीत तसेच पावसाळ्यानंतर १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. पावसाळ्यापूर्वीचे व पावसाळ्यानंतरचे सार्वजनिक स्त्रोतांचे पाणी नमुने MRSAC, Nagpur या कंपनीने तयार केलेल्या Geofencing या Mobile Application च्या सहाय्याने गोळा केले जातात. तसेच १ एप्रिल ते ३० एप्रिल २०१८ या कालावधीत पावसाळ्यापूर्वीची स्वच्छता सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. या कालावधीत एकूण ९२७८ स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ७ ग्रामपंचायतीना लाल कार्ड, २२१ ग्रामपंचायतीना पिवळे कार्ड व २४९ ग्रामपंचायतीना हिरवे कार्ड प्राप्त झाले.